नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ७५ | Issue - 75 | वार शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५ | Blow- Friday Date 1 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची निर्दोष सुटका

## उच्च न्यायालयाने दिला निकाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलेल्या २००८ मधील मालेगाव बॉम्ब ब्लास्ट प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, समीर कुलकर्णी, सुधाकर चतुर्वेदी या सातही आरोपींची सुटका झाली आहे. निर्दोष मुक्त झालेल्या सर्वांनीच १७ वर्षांनी पुनर्जन्म झाल्याच्या भावना व्यक्त केल्या. समीर कुलकर्णींना कोर्टातच अश्रू अनावर झाले.

आरोपींचे वेगवेगळ्या कायदेशीर मुद्द्यांवर एकामागोमाग अर्ज, बॉम्बे हायकोर्ट ते सुप्रीम कोर्टातील अपिले, तपास संस्थांमधील बदल, खटल्याची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांच्या बदल्या यासारख्या विविध कारणांमुळे दीर्घकाळ रखडपट्टी झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल अखेर १७ वर्षांनी आज, गुरुवारी जाहीर झाला.


लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित याने काश्मीरमधून आरडीएक्स आणले आणि त्याने त्याच्या घरी बॉम्ब तयार केला, याचे कुठलेही पुरावे आढळले नाहीत. आरोपी साध्वी प्रज्ञासिंह ठाकुर हिच्याकडे त्या मोटारसायकलचा त्यावेळी ताबा होता, हे सरकारी पक्षाला सिद्ध करता आलेले नाही. तो बॉम्ब त्या मोटारसायकलमध्येच लावलेला होता, असेही निर्विवादपणे सिद्ध होऊ शकलेले नाही. याशिवाय चरश्रशसरेप इेल इश्ररीं घडवण्यासाठी बैठका झाल्या ते देखील सरकारी पक्षाला सिद्ध करता आलेले नाही, असे निरीक्षण कोर्टाने निकालात नोंदवले.

२९ सप्टेंबर २००८ रोजी रात्री ९ वाजून ३५ मिनिटांनी रमझान महिन्यातच, मालेगावमधील मशिदीजवळ एलएमएल फ्रीडम मोटारसायकलमध्ये लावलेल्या बॉम्बचा भीषण स्फोट होऊन हाहाकार उडाला होता. या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर १०१ जण जखमी झाले होते.

२००८ साली झालेल्या मालेगाव बॉम्ब ब्लास्ट व्हरटीक्ट पार्श्वभूमीवर मालेगावात पोलिसांचा चोख बंदोबस्त करण्यात आला होता.

बॉम्बस्फोट झालेल्या भिकू चौक येथे पोलिसांचा मोठा फौजफाटा आहे. निकालाकडे सर्व देशाचे लक्ष लागले असताना स्फोटामुळे हादरलेली दुकानं, त्यांच्या खुणा अजूनही तशाच असल्याचे चित्र आहे.

# अखेर निर्णय झाला! माणिकराव कोकाटेंची उचलबांगडी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वादग्रस्त वक्तव्य, रमीचा खेळ या मुळे गोत्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांचे खाते बदलण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. खातेबदल केला जाणार ही अटकळ बांधण्यात येत होती. ती खरी ठरली आहे. दत्तात्रय भरणे यांचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणिक औकाफ हे खाते माणिकराव कोकाटेंना देण्यात आले आहे. तर माणिकराव कोकाटेंकडील कृषी खाते भरणेंकडे गेले आहे.

कृषीमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर माणिकराव कोकाटे हे वादग्रस्त विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहिले होते. पीक वीमा, शेतकरी, सरकार भिकारी त्यांच्यामुळे महायुती सरकारची अडचण झाली होती. अजित पवारांकडूनही वादग्रस्त विधानासंबंधी त्यांना सल्ला दिला होता. मात्र त्यांची विधाने थांबत नव्हती. अखेर अजित पवार मोठा निर्णय घेणार असे बोलले जात होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ही यासंबंधी आग्रही होते. काही दिवसांपूर्वीच देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौरा केला होता. अनेक मंत्री निशाण्यावर असल्याचेही बोलले जात होते. अखेर त्यात पहिला निर्णय माणिकराव कोकाटेंच्याबाबतीत घेतला गेला.

कोकाटेंची वादग्रस्त विधाने

अलिकडे भिकारीही एक रुपया घेत नाही, आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयात पीक वीमा दिला आहे. शेतकरी पीकवीम्यावर कोकाटेंच वक्तव्य

ढेकळाचे पंचनामे करायचे का? नाशकात नुकसानग्रस्त शेताची पाहणी करताना कोकाटेंचं वक्तव्य

कृषीमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी आणि मला हे खाते दिले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे माणिकरावांनी केलेले वक्तव्य

काही दिवसांपूर्वीच त्यांनी शासन शेतकऱ्यांकडून एक रुपया घेते, पण एक रुपया देत नाही मग भिकारी कोण? शासन भिकारी आहे, शेतकरी नाही असे विधान

पावसाळी अधिवेशनात सभागृहात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलमध्येरमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यानंतर सर्व स्तरातून टीका करण्यात आली होती. कोकाटेंनी याप्रकरणी टीकेला उत्तर दिले होते. मात्र वादग्रस्त वक्तव्य अन् रमी प्रकरण त्यांना भोवल्याचे खाते बदलावरुन दिसत आहे.

# उद्योगांच्या सर्व परवानग्या आता मैत्री पोर्टलवर ऑनलाईन मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाराष्ट्र राज्य हे उद्योग क्षेत्रांमुळे १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहे. त्यामुळे उद्योगांना पाणीपुरवठा, वीज, रस्ते व कनेक्टिव्हिटी, पर्यावरण मंजुरी, वन परवानग्या, मजूर कायदे, जमीनचे वाटप या सर्व सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिल्या पाहिजे. उद्योगधंद्यांना सर्व परवानग्या ऑनलाईन मिळाल्या पाहिजे, यासाठी मैत्री पोर्टल एकिकृत करून त्यावरच सर्व परवानग्या द्याव्यात. त्याचबरोबर, उद्योजकांना शासकीय विभागांसदर्भात काही अडचणी असतील, तर त्यासंदर्भात निनावी तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध विषयांशी संबंधित मुद्यांवर बैठक झाली. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्रि शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेशकुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, उद्योग विभागाचे सचिव डॉ.पी.अन्बळगन, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह यांच्यासह अन्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्योगांकरिता त्यांच्या मागणीप्रमाणे जलसंपदा विभागाने पाणी उपलब्ध करून द्यावे. माजलगाव, दिघी, बुटीबोरी, चामोर्शी (गडचिरोली), जयपूर (छत्रपती संभाजीनगर) आणि पीएम मित्रा (अमरावती) येथे वीज सबस्टेशनच्या उभारणी कामाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे. उद्योगांसाठी वीज वहन आणि देखभालीच्या समस्यांसंदर्भात वेगळी व्यवस्था करण्यात यावी. पर्यावरण विभागाच्या सर्व परवानग्या मैत्री या पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करून द्याव्या. त्याचप्रमाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने शेंद्रा -बिडकीन मार्ग समृद्धी महामार्गाला जोडण्यासंदर्भात कार्यवाही करावी नवीन उद्योगांनी बुटीबोरी येथे जास्त पसंती दिली असल्याने या भागातील रोड कनेक्टिव्हिटी तात्काळ करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले. राज्यातील उद्योगांना कन्सेंट टू इस्टब्लिश व कन्सेंट टू ऑपरेट परवानग्या वेळेवर मिळाल्या पाहिजे, असे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, उद्योगांना लागणाऱ्या अनावश्यक परवानग्या बंद कराव्यात. उद्योग प्रतिनिधीच्या अनाहूत तपासण्या बंद कराव्यात. उद्योगांना जमीनी देण्यासंदर्भात निर्णय आणि परिपत्रकते सुधारित करून एकत्रित करण्यात यावे. उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी स्वतंत्र कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी,असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राच्या ज्या भागात एमआयडीसी आहेत, त्या भागाला औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यात यावा. औद्योगिक नगरीचा दर्जा दिल्यास दुहेरी करासारखी समस्या निकाली निघेल. उद्योगांना देण्यात येणार पात्रता प्रमाणपत्र ऑनलाईन देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जमिनीच्या संपादनासंबंधी तसेच विविध औद्योगिक प्रकल्पासाठी सुरू असलेल्या व प्रस्तावित भूसंपादना प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.**

# झेडपीचे संजय धनशेट्टी यांना बेस्ट कार्यकारी अभियंता पुरस्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांना नवराष्ट्र बेस्ट एक्झिक्युटिव्ह इंजिनीयर पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

नवभारत वृत्तपत्र समूहाच्या आयोजित कार्यक्रमात क्रीडा व युवकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते तसेच विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देऊन धनशेट्टी यांचा सन्मान करण्यात आला.

पुण्यातील तारवाडे क्लार्क वन येथील हॉटेलमध्ये शनिवारी हा पुरस्कार सोहळा पार पडला. सोलापूर शहर आणि ग्रामीण विभागाचा पाणीपुरवठा सुधारण्यासाठी कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी महत्त्वाचे योगदान दिले. दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यात त्यांना यश प्राप्त झाले आहे.

कार्यकुशल पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता अशी ओळख संजय धनशेट्टी यांनी निर्माण केली आहे. त्यांना राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. २०१२-२०१३ साली टंचाई काळात चांगले काम केल्याबद्दल तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि तेव्हाचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते त्यांना गौरवण्यात आले होते. २०१२ मध्ये जिल्हा परिषदेत आदर्श उपअभियंता म्हणूनही धनशेट्टी यांचा गौरव करण्यात आला होता.

## खान अकॅडमी व श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्टसोबत सामंजस्य करार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# दर्जेदार व अनुभवाधिष्ठित शिक्षणातून राज्यातील शालेय शिक्षण क्षेत्रास नवी दिशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व अनुभवाधिष्ठित शिक्षण मिळावे, या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने 'खान अक्ॅडमी' आणि 'श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट' या दोन नामांकित संस्थांशी शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण दोन स्वतंत्र सामंजस्य करार (चेण) केले. या करारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

सह्याद्री अतिथी गृह येथे झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, खान अक्ॅडमीच्या स्वाती वासुदेवन, शोभना मित्तल, श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट चे प्रसन्ना प्रभू व मनीष बादियानी तसेच मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर डॉ. परदेशी, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहूल रेखावार उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची रुची निर्माण करणे, त्यांना उत्तम प्रकारे प्रशिक्षित करणे या दिशेने हा करार एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या सहकार्याने राज्यातील १५० शाळांमध्ये आधुनिक, अनुभवाधिष्ठित शिक्षण प्रणाली विकसित केली जाईल. तर खान अक्ॅडमीच्या माध्यमातून शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या नावाने मराठी व इंग्रजी भाषांमध्ये दर्जेदार अध्ययन कार्यक्रम तयार केला जाणार आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविण्यास मदत होईल व इतर शाळांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संस्थेने यापूर्वीही पाणी व्यवस्थापन व शेतीसारख्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र शासनासोबत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. आता शिक्षण क्षेत्रातही त्यांचा सहभाग एक नवा आदर्श ठरेल.

'डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम'

खान अक्ॅडमी यांच्याशी कराराअंतर्गत 'डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबविला जाणार आहे. त्याचा उद्देश १ली ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे गणित व विज्ञान विषयातील आकलन वाढवणे हा आहे. मराठी व इंग्रजी भाषांमध्ये हे अध्ययन कार्यक्रम उपलब्ध असणार आहे. खान अक्ॅडमी ही आंतरराष्ट्रीय ख्यातीची संस्था विद्यार्थ्यांना स्वतःच्या गतीने (शिश्रष-रिलशव श्रशरीपळपस) शिकण्याची संधी देत असून त्यांनी १० हजारांहून अधिक शैक्षणिक व्हिडिओ विकसित केले आहेत.

हा करार ३ वर्षांच्या कालावधीसाठी आहे. उपक्रमाची अंमलबजावणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था करणार आहे.

**१५० शाळांमध्ये अनुभवाधिष्ठित शिक्षण प्रणाली विकसित होणार;**

आर्ट ऑफ लिव्हिंग अंतर्गत कार्यरत श्री श्री रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट व शालेय शिक्षण विभाग यांच्यातील कराराअंतर्गत सुरुवातीस १५० शाळांमध्ये या कार्यप्रणालीचे कार्यान्वयन करण्यात येणार आहे. शाळांची पूर्वतपासणी व शाळा विकास आराखडा तयार केला जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उल्लेख असलेल्या 'स्कूल कॉम्प्लेक्स' संकल्पनेनुसार मॉडेल शाळा, पीएम श्री व सीएम श्री शाळांचा यात समावेश असेल. ही संस्था शिक्षण, ग्रामीण व कौशल्य विकासात कार्यरत असून शाळांमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षक व विद्यार्थ्यांचे क्षमता विकास आणि समाजाचा सक्रिय सहभाग यावर भर देईल. अशी माहिती यावेळी देण्यात आले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०२५


## संपादकीय....

### उचलबांगडी

पावसाळी अधिवेशनात सभागृहात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलमध्येरमी खेळत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर व्हिडिओ पोस्ट केला होता. त्यानंतर सर्व स्तरातून टीका करण्यात आली होती. कोकाटेंनी याप्रकरणी टीकेला उत्तर दिले होते. मात्र वादग्रस्त वक्तव्य अन् रमी प्रकरण त्यांना भोवल्याचे खाते बदलावरुन दिसत आहे. वादग्रस्त वक्तव्य, रमीचा खेळ या मुळे गोत्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांचे खाते बदलण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. खातेबदल केला जाणार ही अटकळ बांधण्यात येत होती. ती खरी ठरली आहे. दत्तात्रय भरणे यांचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणिक औकाफ हे खाते माणिकराव कोकाटेंना देण्यात आले आहे. तर माणिकराव कोकाटेंकडील कृषी खाते भरणेंकडे गेले आहे. कृषीमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर माणिकराव कोकाटे हे वादग्रस्त विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहिले होते. पीक वीमा, शेतकरी, सरकार भिकारी त्यांच्यामुळे महायुती सरकारची अडचण झाली होती. अजित पवारांकडूनही वादग्रस्त विधानासंबंधी त्यांना सल्ला दिला होता. मात्र त्यांची विधाने थांबत नव्हती. अखेर अजित पवार मोठा निर्णय घेणार असे बोलले जात होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ही यासंबंधी आग्रही होते. काही दिवसांपूर्वीच देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौरा केला होता. अनेक मंत्री निशाण्यावर असल्याचेही बोलले जात होते. अखेर त्यात पहिला निर्णय माणिकराव कोकाटेंच्याबाबतीत घेतला गेला.

## अपघात; अज्ञात दुचाकी चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) म्हसोबा चौकात अपघात प्रकरणी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २७ जुलै रोजी सायंकाळी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास म्हसोबा चौक येथे घडली.याप्रकरणी सिद्धार्थ अनिल थोरात (वय-३२,रा. रमाबाई आंबेडकर नगर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची आई शेजारील काकू शशिकला,फिर्यादी यांची काकू स्वाती असे मिळून वॉकिंग करून वरील ठिकाणी घराकडे जात असताना रुपा भवानी चौकाकडून येणारे दुचाकी क्रमांक एमएच.१३.सी.झेड. १९६६ यावरील चालकाने मागून फिर्यादी यांची आई यांना धडक दिल्याने त्यात त्यांना मार लागून गंभीर जखमी झाल्या.तसेच संशयित आरोपी याने उपचारास न नेता तेथून निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भोगशेट्टी हे करीत आहेत.


# साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राच्या माती मध्ये अनेक साहित्यिक उदयास आले. यामध्ये पु.ल.देशपांडे, प्र.के.अत्रे, मामा वरेरकर, केशव सुत, वि.वा.शिरवाडकर, वि.स. खांडेकर, शिवाजी सावंत, ना.शि.फडके, राम गणेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज,ग.दी .माडगुळकर, रंजीत देशाई, दुर्गा भागवत,असे किती तरी नावे सांगता येथील ज्यांचा इथे उदाहरणा दाखल नामोउल्लेख झाला त्यानी आणि ज्यांचा नामो उल्लेख झाला नाही असा दिग्गज लेखक साहित्यिकानी मानवी जिवनाल आनंद देणारे,मानवी मनाला समाधान देणारे साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण केले.संत साहित्यातून महाराष्ट्राला वारकरी सांप्रदयाचा वारसा मिळाला. यातूनच अखिल भारतिय मराठी साहित्य सम्मेलनाचा जन्म झाला.

तर दलित शोषित पिडीतांच्या, उपेक्षितांच्या कष्टकरी काम कारांच्या व्यथा आणि वेंदनांचा ठाव घेत मला रडणे मान्य नाही तर मला लढणे मान्य आहेअसा क्रांतीकारी संदेश देत अन्यायग्रस्थाना आपल्या न्याय हक्कासाठी लढण्याचे बळ देणारे,मानवी जिवनाचे वास्तववादी साहित्य निर्माण करणारे साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेत प्रा.शंकरराव खरात, प्रा. गंगाधर पानतावने,दया पवार,पद्मश्री नामदेव ढसाळ, राजा ढाले, प्रा.अरुण कांबळे, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर, उचल्याकार लक्ष्मन गायकवाड, उपराकार,लक्षन माने,अक्कर माशीकार शरणकुमार लिंबाळे सह इतर नामवंत दलिन साहित्यिकानी उपेक्षितांचे वास्तवादी जिवन,दलित उपेक्षितांवर प्रस्थापीत समुहाकडून होणारे अन्य अत्याचार, दलित उपेशितांच्या कष्ठकरी कामगारांच्या व्यथा आणि वेदना आपल्या साहित्यांतून जगाच्या वेशीवर मांडल्या यातूनच विद्रोही साहित्य सम्मेलनाचा जन्म झाला.आणि कल्पनेच्या भराऱ्या मारणाऱ्या साहित्य चळवळीला एक वेगळी दिशा मिळाली आणि समाजातले खरे अंतरंग जगापुढे आले.या विद्रोही साहित्यावर जगाला मानवतेची शिकवन देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध, संत रविदास,संत कबीर, छापती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज,महात्मा फुले आदी महामानवांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

या एकून साहित्य क्षेत्रात अण्णा भाऊ साठे यांचे नाव साहित्य सम्राट म्हणून पुढे आले. ते त्यानी निर्मान केलेल्या वास्तववादी साहित्यामुळेचं.अणाभाऊ साठे यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू म्हणजे इथला दलित,उपेक्षित,शोषीत पिडीत, अन्यायग्रस्थ, कष्ठकरी कामगार माणूस आणि त्यांच्या व्यथा वेदना व त्यांचा संघर्ष हाचं आहे. अर्थात उपेक्षित माणसाच्या वाट्याला आलेले मानवी जिवनाचे वास्तवादी चित्र हेच त्यांच्या साहित्याच्या केंद्रस्थानी दिसून येते. त्यांची एक एक कथा, कांदबरी,वगनाट्य म्हणजे समाजात प्रत्यक्षात घडलेला,पाहिलेला,अनूभवलेला प्रसंग होय.मानवी जिवनाचे वास्तव होय. गावकुसा बाहेर राहणाऱ्या उपास पोटी काबाड कष्ट करणाऱ्या आपले मानवी हक्क हिरावून बसलेल्या,चुल बंद असलेला समाजातील गोर गरिब कुटूंबाची एक वेळेची तरी भूक भागावी म्हनूण आपल्या वाट्याचा धनाचा साठ साठवून ठेवलेल्या धनदांडग्यांच्या तावडिनतून हिसकावून घेवून तो गोर गरिबांना वाटणारा,देश स्वातंत्र्याच्या चळवळीत इंग्रजाना सळो की पळो करून सोडणारा आण्णा भाऊ साठे यांचा मामा फकिरा याला अखेर चोर दरोडेखोर ठरवून इंग्रज पोलीसांचा सरेमीरा त्याच्या पाठीमागे लावन्यात आला. एकीकडे गोर गरिबांसाठी त्यांच्या भाकरी करिता संघर्ष तर दुसरीकडे इंग्रजाच्या जुलमी राजवटी विरुद्ध संघर्ष त्या संघर्षातच आपले आयुष्य खर्ची घालणारा फकीरा हा अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा विषय होतो. यातूनच फकिरा नावाची कांदबरी जन्म घेते.या कांदबरीवर फकीरा नावाचा



मराठी चित्रपट निघाला आहे.शासनाने या कांदबरीला पुरस्कार ही दिला आहे.असा दर्जेदार सात कांदबरीवर मराठी चित्रपट निघाले आहेत.या मध्ये फकीरा सह वारणेचा वाघ,चिखलातील कमळ,वैजयंत,चित्रा,माकडीचा माळ, आवडी, अलगुज आदी कादंबरींचा समावेश आहे. यातूनच अण्णा भाऊ साठे यांच्याकडे असलेल्या प्रचंड प्रतिभा शक्तीचा अंदाज आपलाला येतो.

अशा प्रचंड प्रतिभा शक्ती लाभलेल्या साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचा जन्म दि.०१ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव ता.वाळवा जिल्ह सांगली येथे आई वालूबाई व वडिल भाऊराव साठे यांच्या पोटी अत्यंत सामान्य कुटूंबात मातंग समाजात झाला.दारिद्र हे त्यांच्या पाचवीला पुंजलेलेचं होते.आई वडिलानी त्यांचे नाव तुकाराम ठेवले होते. अर्थात तुकाराम भाऊराव साठे हे त्यांचे पूर्ण नाव.लहान पणा पासूनच त्याना नदया,नाले,डोंगर झाडीत फिरणे निसर्गातील पाने फूलं पशू पक्षी पहाणे त्यांचा अभ्यास करणे, शेजारी गावा गावातील यात्रेला जाणे तमाशा पहाणे असे अनेक छंद जडले होते.यातुनच त्यांच्या प्रतिभा शक्तीला चालना मिळाली असे म्हणावे लागेल. मुंबईत राहणाऱ्या नातेवाईकांच्या अग्रहाखातर भाऊरावानी त्यांचे नाव शाळेत घातले होते.पण दिड दिवसातच आण्णा भाऊनी शाळेकडे पाट फिरवली. लवकरच कुटूंबाची जबाबदारी ही त्यांच्यावर पडली आणि अण्णा भाऊनी मुंबई गाठली. मुंबईत हाती पडेल ते काम करत करत दिवस काढत असतानाचं त्याना एका गिरणी मध्ये (कोहीनूर मिल) काम मिळाले आणि आण्णा भाऊ साठे गिरणीकामगार झाले.कालांतराने मुंबई मधिल गिरण्या बंद पडल्या आणि गिरणी कामगारांच्या कुटूंबावर उपासमारिची वेळ आली आणि गिरणी कामगारांच्या न्यायिक मागण्यांची चळवळ सुरु झाली तर दुरुीकडे संयुक्त महाराष्टाची चळवळीने जोर धरला होता.या दोन्ही चळवळी मध्ये संघटनात्मक बांधणीचे अत्यंत महत्वाचे कार्य आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत लाल बावटा कला पथकाच्या माथ्यमातून अण्णा भाऊ साठे करित होते.


माटुंगा मुंबई येथिल लेबर कॉलनीतील कम्यूनिष्ठ पक्षाचे नेते मंडळी समवेत आण्णा भाऊ साठे हे चळवळीत सक्रिय झाले. होते. लेबर कॉलणीत जागो जागी तुंबलेल्या गटारीमुळे मच्छरचा प्रादुर्भाव वाढल्याने त्या मच्छवर अण्णाभाऊ साठे यानी प्रथम पवाडा लिहीला खऱ्या अर्थान येथूनच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला आणि शाहीरीला सुरुवात झाली आणि आण्णा भाऊ यांची शाहीरी परेशी रशियात कष्टकरी कामगारांच्या व्यथा आणि वेदना घेवून व छत्रपती शिवरायांच्या जीवन चरित्रावर अधारीत पोवाडा घेवूनचं थांबली तर मच्छराच्या पोवाड्या पासून सुरू झालेला साहित्य प्रवास हा ३५ कादबंऱ्या,१३ लोक नाट्य,१३ कथा,१५ पोवाडे,६ नाटके इतके प्रचंड साहित्य निर्माण करून थांबला.पायी मुंबईला आलेले आण्णा भाऊ साठे हे विमनाने रशियाला गेले.यामुळे माझा रशियाचा प्रवास हे प्रवास वर्णन पुस्तक उदयास आले.संयुक्त महाराष्ट्राची चळवळ,कष्ठकरी कामगारांची चळवळ कम्यूनिष्ट पक्षाच्या माध्यमातून करत असताना अण्णा भाऊ साठे हे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मानव मुक्तीच्या लढ्याकडेही लक्ष केंद्रीत केलेले होते.त्यानी लिहीलेली फकीरा कांदबरी ही आण्णा भाऊ साठे यानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखनीला अर्पण केली आहे. दि.६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वान झाले. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाना नंतर आयोजित केलेल्या शोक सभेत अण्णा भाऊ साठे यानी जग बदल घालूनी घाव मज सांगुन गेले भिमराव अशा भावपूर्ण गिताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना आदरांजली वाहीली.

दि.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश इंग्रजाच्या तावडीतून स्वतंत्र झाला. सगळीकडे आनंद व्यक्त केला जात होता. यावेळी एक प्रसंग आण्णा भाऊच्या समोर घडला. तो म्हणते एक सवर्ण समल्याजाणाऱ्या समाजातील व्यक्ती व एक मातंग समाजातील व्यक्ती एका हॉटेल मध्ये चहा घेत असताना हॉटेल मालकाने दोन वेगवेगळ्या कपात चहा दिला. त्यानी मागासवर्गीय लोकासाठी वेगळ कप ठेवला होता. हे चित्र अण्णा भाऊनी पाहीले आणि लगेचं दुसऱ्या दिवसी म्हणजे दि.१६ ऑगस १९४७ ला स्वतंत्र्य कोणाला मिळाले तुझ्या कपाला की माझ्या कपालाअसे म्हणत ये अझादी झुटी है । देश की जनता भूकी है । असा नारा देत प्रचंड मोर्चा काढला आणि देशातील गोर गरीब जणतेच्या व्यथा स्वातंत्र चळवळीतील नेत्या समोर या मोर्चाच्या माध्यमातून मांडल्या.असा बंडखोर साहित्य सम्राट पुन्हा होणे नाही.



दि.१ ऑगस हा आण्णा भाऊ साठे यांचा जयंती दिन. त्यांच्या जयंती निमित्ताने त्याना विनम्र आभिवादन.

**– एस.के.गायकवाड**
**मु.पो. वागदरी ता. तुळजापूर**
**मो.न.९३७४२०३**
**( लेखक आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आहेत.)**



# अण्णा भाऊ साठे : गरीब-शोषितांचं दुःख आणि विद्रोह शब्दात गढलेला शाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आता बघा, आपल्याकडे काही माणसं असं आयुष्य जगतात की त्यांच्या वेदना, त्यांचं दुःख, त्यांचं रुसलेपण शब्दांत उतरलं की लोकांच्या काळजात थेट घर करतं. असंच एक भारी व्यक्तिमत्त्व म्हणजे आपले अण्णा भाऊ साठे. त्यांच्या नावातच तेज आहे, आणि त्यांच्या बोलण्यात, त्यांच्या गाण्यांत, त्यांच्या लेखनात – शोषितांच्या भावना जिवंत होऊन उठतात.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातल्या वाटेगाव नावाच्या लहानशा गावात एका मांग कुटुंबात अण्णा भाऊंचा जन्म झाला. लहानपण फार हलाखीत गेलं. गरीबीत, भुकेत आणि जातीभेदाच्या तडाख्यात मोठे झाले. शाळेत तर फक्त दीड दिवसच गेले. पण आयुष्य त्यांना मोठं शिकवणारं ठरलं. कोणत्याही पुस्तकी ज्ञानाशिवाय, अण्णा भाऊंनी जे शिकलं ते थेट लोकांच्या जीवनातून आणि जगण्याच्या अनुभवातून.त्यांनी खूप मजुरी केली, डोक्यावर उष्टं उचललं, मजुरासारखं जगले. पण तेवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांची लेखणी, त्यांची कविता, त्यांचे पोवाडे – हे सगळं त्यांनी लोकांच्या दुःखासाठी वापरलं. 'फकिरा' ही त्यांची कादंबरी म्हणजे त्यांच्या लेखणीचं तेज. यात एक असं पात्र आहे, जे ब्रिटिश सरकारविरुद्ध आणि गावातल्या अन्यायाविरुद्ध उभं राहतं – पण त्याचं शेवटी फासावर चढवून संपवलं जातं.

अण्णा भाऊ साम्यवादी विचारांनी भारलेले होते. श्रीपाद डांगे यांचे विचार त्यांच्या मनात खोलवर बसले होते. अमर शेख आणि दत्ता गवाणकर यांच्यासोबत त्यांनी 'लालबावटा कला पथक' स्थापन केलं. यातून त्यांनी पोवाडे, लावण्या, नाटके यांच्यातून गरिबांचं दुःख सांगितलं. गावागावांत, वाड्या-वस्त्यांत जाऊन त्यांनी शोषितांचे आवाज लोकांपर्यंत पोहोचवले.

स्वातंत्र्य मिळालं, पण समाजातला अन्याय काही संपला नाही. म्हणूनच १६ ऑगस्ट १९४७ रोजी अण्णा भाऊंनी हजारोंचा मोर्चा मुंबईत नेला आणि म्हणाले, ये आजादी झूटी है, देश की जनता भुकी है। त्यांच्या शब्दांमध्ये केवळ राग नव्हता, तर वंचितांचं दुःख, व्यथा आणि आशा होती.

त्यांनी ३५ कादंबऱ्या, १५ कथासंग्रह, अनेक लोकनाट्य, गीते आणि कविता लिहिल्या. 'गुलाम', 'माकडीचा माळ', 'रत्ना', 'चिखलातील कमळ', 'वैजयंता', 'रूपा' अशा कितीतरी कादंबऱ्या आजही लोकांच्या मनात घर करून आहेत. त्यांच्या कथांचं अनेक देशी आणि परदेशी भाषांमध्ये भाषांतर झालं. त्यांच्या लिखाणावर आधारित सिनेमेही निघाले – 'फकिरा', 'डोंगरची मैना', 'वैजयंता' हे त्यातले काही.

त्यांचं लेखन कधी हळवं असायचं, तर कधी अंगावर शहारा आणणारं. एका वाक्यात सांगायचं झालं, तर त्यांनी दुःखाला, भुकेला, अन्यायाला शब्द दिले – आणि त्या शब्दांतून शोषितांना ताकद दिली. त्यांच्या पोवाड्यांत क्रांतीचा आवाज होता, तर लावण्यात मातीचा गंध.

२०१९ साली त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त भारतीय पोस्टाने त्यांचं ₹४ चं टपाल तिकीट काढलं. पुण्यात त्यांचं स्मारक उभं आहे, मुंबईतल्या उड्डाणपुलाला त्यांचं नाव दिलंय. त्यांच्या स्मृती जपणारी अनेक ठिकाणं आणि संस्था आजही कार्यरत आहेत.

त्यांच्यावर अनेक पुस्तकंही लिहिली गेली – 'अण्णा भाऊ साठे विचारधन', 'क्रांतिकारी अण्णा भाऊ साठे', 'अण्णाभाऊंचा संदेश', 'अण्णा भाऊ साठे : चरित्र आणि कार्य' अशी.

अण्णा भाऊ म्हणायचे – ही पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नाही, तर दलित व कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे. त्यांच्या या वाक्याने आजही अनेकांच्या मना-मनात स्फुलिंग पेटतं.

वि.स. खांडेकरसारख्या साहित्यिकांनीही त्यांना मान्यता दिली आणि म्हटलं की, अण्णा भाऊंच्या गोष्टींमध्ये जीवनातल्या खऱ्या दुःखाचं दर्शन होतं. त्यांच्या लेखणीला जीव आहे.

आज त्यांची जयंती आहे. फक्त हार घालून त्यांना विसरण्याचा दिवस नाही हा – तर त्यांच्या विचारांना, त्यांच्या लढ्याला, त्यांच्या लेखणीला आठवण्याचा दिवस आहे. अण्णा भाऊ साठे म्हणजे शोषितांचं बळ, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी लेखणी आणि माणुसकीचा आवाज.

आणि म्हणूनच, गावात असो की शहरात – शेतात असो की गिरणीत – अण्णा भाऊंच्या शब्दांची आणि विचारांची आठवण म्हणजे संघर्षाच्या वाटेवर चालणाऱ्या प्रत्येकासाठी दीपवाट आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## खासदार प्रणिती शिंदे यांचे संसद भवन परिसरात आंदोलन

# केंद्र सरकारची महाराष्ट्र शासनाने बंद केलेली 'एक रुपयात पिक विमा योजना' पुन्हा सुरू करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी लागू केलेली 'एक रुपयात पीक विमा योजना' बंद केल्याच्या निषेधार्थ खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील काँग्रेसचे खासदारांनी नवी दिल्लीतील संसद भवन परिसरात जोरदार निदर्शने करत ही योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी केली.

यावेळी आंदोलनादरम्यान शेतकरी रडतोय – विमा कंपनी नफा फुगवतेय, शेतकरी आत्महत्या करतोय – सरकार झोपेचे सोंग घेतोय, पिक गेले – आश्वासन राहिले, शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळू नका, फसल विमा योजना नव्हे – फसवी विमा योजना, कागदावर विमा नको –




शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे हवेत, पीक विमा योजना – शेतकऱ्यांची लूट,

### शेतकरी रडतोय, विमा कंपनी नफा फुगवतेय

सरकारचे धोरण कंपन्यांचा फायदा, शेतकऱ्यांच्या आत्महत्येला सरकार जबाबदार, शेतकरी भरतो हप्ता, विमा कंपन्यांचे उत्पन्न वाढते, शेतकऱ्यांच्या वेदना ऐका, नाहीतर शेतं ओसाड राहतील, पीक विमा फक्त धनदांडग्यांसाठी – गरीब शेतकऱ्यांचं काय?, शेतकरी जगला पाहिजे – हे सरकार बदललं पाहिजे, दूध खरेदीला अनुदान द्या, शेतकऱ्यांना न्याय द्या, प्रेमियम घेतलं, नुकसानभरपाई दिली नाही – हिशेब द्या. अशा जोरदार घोषणांनी संसद भवन परिसर दणाणून गेला.

# राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत प्रेम वेदपाठक चतुर्थ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य पदवीधर प्रकोष्ठ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर



यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत हनुमान विद्यालय सुपली तालुका पंढरपूर चा विद्यार्थी कु.प्रेम मनोहर वेदपाठक इयत्ता सातवी याचा या स्पर्धेमध्ये चतुर्थ क्रमांक मिळाला आहे. या यशा बद्दल प्रेम वेदपाठक याचा सन्मान डॉ. नवनाथ खांडेकर, प्रशांत माळवदे, प्रवीण लिंगडे , मनोहर माने, प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक यलमार, सुपली गावचे सरपंच काजल घाटुळे यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे मुख्याध्यापक अशोक यलमार हे होते. यावेळी शिक्षक मुलानी, लवटे, विलास पाटील, हनुमंत यलमार, वेदपाठक, उत्पात, भिसे, कुलकर्णी, लता येलमर, कांतीलाल कदम, सुखदेव कावडे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी डॉ. खांडेकर म्हणाले, महाराष्ट्रातून ११००० निबंध लेखकांनी सहभाग घेतला होता त्यात आपल्या इथून १००० पेक्षा जास्त मुलांनी स्पर्धेत भाग घेतला होता. आपल्या १००० नाव नोंदणीत २ विद्यार्थ्यांचा समावेश झालेला आहे. लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पदवीधरचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते यांच्या उपस्थितीत भव्य दिव्य कार्यक्रम घेऊन कु.प्रेम वेदपाठक याचा सन्मान करून बक्षीस देण्यात येईल असे डॉ. खांडेकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर माने यांनी केले. सूत्रसंचालन हनुमंत यलमार यांनी केले, आभार प्रशांत माळवदे मानले. यावेळी पालक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर तालुक्यात १ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताहाचे आयोजन : तहसिलदार सचिन लंगुटे

## तालुक्यात महसूल सप्ताहनिमित्त विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत तालुक्यात नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच, त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने, १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार असून, तालुक्यात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

महसूल सप्ताहामध्ये समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये शुक्रवार १ ऑगस्ट, २०२५ रोजी महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार असून या दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण तसेच मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे. शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्यात येणार आहे. रविवार दि ३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहेत.

तसेच सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी मंडळनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. मंगळवार दि. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे. बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार निर्णय घेण्यात येणार आहे. गुरुवार दि. ०७ रोजी कृत्रिम वाळू (एम -सँड) धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन



मानककार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे तसेच महसूल सप्ताह सांगता समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली .

या महसुल सप्ताहात लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, स्वयंसेवी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, सर्व घटकातील मान्यवर व्यक्ती तसेच विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी दि १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत सहभाग नोंदवावा असे आवाहनही तहसिलदार लंगुटे यांनी केले आहे.

# पत्रकारांच्या उन्नतीसाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन : नितीन शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पत्रकारांच्या बंधूंच्या कोणत्याही प्रकारच्या समस्या व अडचणी सोडवून त्यांना येणाऱ्या कुठल्याही समस्याला मी सामोरे जाऊन त्यांच्या उन्नतीसाठी मी सदवी प्रयत्नशील राह- तील अशा प्रकारांची प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सन्माननीय नितीन शिंदे यांनी व्यक्त केली सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना भारताची दक्षिण दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्री विठुरायाच्या दर्शनासाठी श्री पंढरी नगरीमध्ये आले असता ते श्री विठोबाच्या दर्शनानंतर त्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा पंढरपूर यांच्या वतीने त्यांचा सन्मान सोहळा चे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन आयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्र जी कोरके-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूर पंढरपूर च्या सर्व पदाधिकारी व कार्यकारी सदस्य यांच्या वतीने आयोजित केला होता यावेळी बोलताना शिंदे आपले मनोगत व्यक्त करत होते.

यावेळी या संघाचे उपाध्यक्ष रामदास नागटिळक यांनी संघाच्या वतीने वतीने संघटनेच्या वतीने राबवलेल्या विविध सामाजिक कार्यक्रमाची माहिती आपल्या मनोगत मध्ये दिले त्यानंतर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची पश्चिम महाराष्ट्रात अध्यक्ष सन्माननीय राजेंद्र जी कोरके-पाटील यांच्या शुभहस्ते सर्व पत्रकार बंधूंच्या समावेश सत्कार करण्यात आला या कार्यक्रमासाठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष संतोष मोरे तालुका अध्यक्ष रवी कोळी सचिव कुमार कोरे आदीसह संघाचे सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते

# स्वा.सावरकर विद्यालय कोठुरे येथे पालक मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य सुधाकर भाऊ मोगल हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते यावेळी सुयोग भाऊ गीते, प्रकाश कोरडे ,सुधाकर भाऊ मोगल, पुंजाराम कडलग बाळकृष्ण मोगल, रविंद्र दिघे व मोठ्या संख्येने पालक व माता पालक उपस्थित होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष व मंचावर उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकातून विद्यालयाचे मुख्याध्यापक सन्माननीय सातपुते एस. एल. यांनी शाळेमध्ये विविध शैक्षणिक योजना तसेच आर्थिक दृष्ट्या शाळेच्या सुधारणा विद्यार्थ्यांचे प्रगती याविषयी माहिती सांगितली. शिक्षक मनोबतात दहावीच्या वर्ग शिक्षिका चितळकर मॅडम व विज्ञान शिक्षक दवते सर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थी पालक व शिक्षक या त्रिवेणीची माहिती सांगून त्या दृष्टीने तीनही घटक महत्त्वपूर्ण आहेत याची जाणीव करून दिली. यावेळी अप्रगत तासिकेसाठी असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या बदलाची प्रतिक्रिया प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी यावेळी नमूद केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी विद्यालयाला आवश्यक असलेली मदत शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

पालक मेळावा यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष परिश्रम लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भडांगे के आर व आभार प्रदर्शन सानप एस.डी यांनी केले

# स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांची 'ऐश्कांता एनलेटिक्स' कंपनीत निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः : 'ऐश्कांता एनलेटिक्स' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या दोन विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

पुणे येथील 'ऐश्कांता एनलेटिक्स' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून धनश्री यशवंत बागल व संकेत सोमनाथ कोळी या दोन विद्यार्थ्यांची




निवड केली. या नामांकित मल्टीनॅशनल कंपनीत सिलेक्शन झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचे वार्षिक पॅकेज प्रत्येकी रु. ३.५ लाख इतके आहे. स्वेरी मध्ये नवनवीन आंतरराष्ट्रीय कंपन्या येत असतात आणि त्यातूनच कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड होत असते. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. ए.ए.मोटे , डॉ. एस. एम. खोमणे यांच्यासह इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. या दोन्ही विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'ऐश्कांता एनलेटिक्स पुणे' कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पुस्तके वाचाल तर, पुस्तकेच तुम्हाला वाचवेल : बालमुकुंद राठी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शिक्षण क्षेत्रात कोविडच्या महामारीनंतर मोबाईलचा अतिरेक विद्यार्थ्यांमध्ये होताना दिसत आहे. एका कुटुंबात पाच सदस्य असतील तर प्रत्येक सदस्याकडे स्वतंत्र मोबाईल आहेत. प्रत्येक सदस्य मोबाईल ग्रस्त झाला आहे. मोबाईलच्या अतिवापराने विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रतेचा नाश, निद्रानाश, एकल कोंडेपणा, व्यसनाधीनता, वेभीचर, चिडचिडेपणा मुलांमध्ये वाढल्याचा दिसून येत आहे. सोशल मीडियावर मिळणारी माहिती अवास्तव असल्याने मुलांचा भ्रमनिरास होत आहे. मुलांना पुस्तके वाचण्याची आवड निर्माण करायची असेल तर मोबाईल पासून त्यांना दूर ठेवले पाहिजे. शाळेत शिक्षक व घरी पालक या दोघांनी ही जबाबदारी घेतली पाहिजे. मुलांनी आज पुस्तके वाचली तर, पुस्तकेच त्यांना वाचू शकणार आहेत. विज्ञानाच्या, स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर पुस्तकांशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हास्तरीय शालेय विद्यार्थ्यांची रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्याच्या बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, सांख्यिकी विभाग प्रमुख दिनेश राठोड, क्लस्टर प्रिव्हेन्शन ऑफिसर ब्रह्मदेव श्रीमंगले, ए. एस. जाधव मॅडम, एम. सी. चिकल्ली मॅडम, व्ही. सी. इंगळे मॅडम, एस. के. मुदकन्ना मॅडम, जी. ए. कटारे, एस. जी. पाटील आदी उपस्तिथ होते.

ही स्पर्धा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये घेण्यात आली. सुभाषचंद्र बोस हायस्कूल, दयानंद काशिनाथ असावा प्रशाला, अहिल्याबाई हायस्कूल व जुनिअर कॉलेज, विद्यानिकेतन प्रशाला, एस.व्ही.सी.एस हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, भवानी पेठ आदी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. ही स्पर्धा ५० प्रश्नांची व १०० गुणांची घेण्यात आली. स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या दयानंद काशिनाथ असावाच्या शुभम समाधान कुंभारला रू. १५००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक आलेल्या एस.व्ही. सी.एस हायस्कूलच्या सक्षम अप्पाराव माने याला रू. १०००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र तर एस.व्ही.सी.एस हायस्कूलच्याच तृतीय क्रमांक आलेल्या श्रेया किरण पाटील हिला रू. ५००/- रोख, मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेता शुभम कुंभार हा राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे कृष्णा सकट यांनी सांगितले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले. स्वागत कृष्णा सकट यांनी केले. प्रास्ताविक दिनेश राठोड यांनी केले तर आभार कपिल भालेराव यांनी मानले.

# सुनिता भोसले यांची समाजसेवा पुरस्कारासाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : केरूर ता.तुळजापूर येथिल पारधी समाजातील सामाजिक कार्यकर्त्या सुनिता भोसले यांची आदर्श समाजसेवा पुरस्कारासाठ निवड करण्यात आली असून लवकरच एका शानदार कार्यक्रमा या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.



भटके विमुक्त आदिवासी पारधी विकास सामाजिक संघाना महाराष्ट्र राज्य च्या राष्ट्रीय महिला अध्यक्षा तथा पारधी आदिवासी बहुउद्देशिय सामाजिक संस्था केरूर च्या सचिव सुनिता भोसले यांची संत तुकाराम सामाजिक संस्था बाभळगाव व संभव प्रतिष्ठाण केशेगाव ता.तुळजापूर च्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरिय आदर्श समाजसेवा पुरस्कार-२२५ साठी निवड झाली असून लवकरच त्याना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कारासाठी निवड झाल्याचे रितसर पत्र संस्थेचे संख्यापक दयानंद काळूंके व तुकाराम क्षिरसागर यानी त्याना दिले आहे. सदर पुरस्कारासाठी त्यांची निवड झाल्य बदल त्यांचे सर्वत्र आभिनंदन केले जात आहे.

**परमपूज्य स्वरूपानंद सरस्वती स्वामीजी यांचे विचार**

**डॉ. विश्वनाथ दा. कराड 'शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार' ने सन्मानित**

# शैक्षणिक संस्था ह्या संस्कार व सद्विचारांची विद्यापीठे व्हावीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : देशातील सर्व विद्यापीठांकडून अत्याधुनिक शिक्षण दिले जावे, मात्र संस्कार आणि सद् विचार हे जीवन घडविणारे असतात. त्यामुळेच शैक्षणिक संस्था या सद्विचारांचे विद्यापीठ व्हावेत. संस्कार हे जीवन घडविणारे, विचार तर्क शुद्ध असल्याने सुंदर नव पिढी निर्माण करू शकू. असे विचार श्रुतिसागर आश्रम फुलगावचे संस्थापक परमपूज्य स्वरूपानंद सरस्वती स्वामी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र कीर्ति सौरभ प्रतिष्ठानच्या वतीने परमपूज्य स्वरूपानंद सरस्वती स्वामी यांच्या हस्ते एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड





यांना 'शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार' २०२५ या विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांना एक लाख रुपयांचा धनादेश, स्मृती चिन्ह, मानपत्र, पगडी, कवड्याची माळ आणि शेला प्रदान करण्यात आला. तसेच, इतिहास अभ्यासक डॉ. केदार फाळके यांना श्रीमंत मोरेश्वर बळवंत पुरंदरे शिष्यवृत्ती २०२५ ने सन्मानीत करण्यात आले. त्यांना प्रशस्तीपत्रक, ५० हजार रुपयांचा धनादेश, कवड्याची माळ व पगडी देऊन सन्मानीत करण्यात आले.

यावेळी भारत इतिहास संशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, अमृत पुरंदरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे संचालक रवींद्र वंजारवाडकर होते. जाणता राजाचे कलाकार सुनील थोपटे यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

स्वरूपानंद सरस्वती स्वामी म्हणाले,बाबासाहेबांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार महान शिक्षणमहर्षिला दिला गेला आहे. योग्य पुरस्कार योग्य व्यक्तिला देणे हाही एक योगायोग आहे. मन हे माणसाला शुन्यापासून उच्च स्तरापर्यंत घेऊन जाते. तसेच ते उच्च स्तरापासून जमिनीपर्यंत ही आणते. अशा वेळेस काळानुरूप मनावर संस्कार घडविणारी शिक्षण पद्धती गरजेची आहे.

सत्काराला उत्तर देतांना डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,जीवनभर विनम्रतेने कार्य करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आंतरिक समाधानाची अनुभूती घेत आहे. सद्गुणांची पूजा हीच ईश्वराची पूजा आहे. बाबासाहेब वयाच्या शंभरीत पदार्पण करीत होते. तेव्हा त्यांची भेट घेतली. बाबासाहेब नेहमी नम्रतेने, लीनतेने बोलत. शिवरायांच्या जीवनाचे खरे दर्शन बाबासाहेबांनी राज्याला आणि देशाला एका वेगळ्या भूमिकेतून घडवले.

डॉ. केदार म्हणाले,बाबासाहेब पुरंदरे नेहमीच म्हणत असे की घाबरत असाल तर इतिहासाचा अभ्यास करू नका. इतिहास संशोधकाने सत्य कथन करावे, त्याने मागे कधीच हटू नये आणि कोणाचा अपमान ही करू नये. सातत्याने सत्याचा वेध घेऊन समस्यांच्या मुळापर्यंत पोहोचावे.

रवींद्र वंजारवाडकर म्हणाले, डॉ. विश्वनाथ कराड यांना बाबासाहेब यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार म्हणजे एका ध्यासपर्वाने दुसर्या ध्यासपर्वाचा केलेला सन्मान असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बाबासाहेबांनी इतिहासात जसे आहे तसेच मांडले, त्यांनी कधिही सत्येची मोडतोड केली नाही.

त्यानंतर प्रदीप रावत आणि अमृत पुरंदरे यांनी बाबासाहेब पुरंदरे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी व राधा पुरंदरे आगाशे यांनी आभार मानले.

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून लाकडाने मारहाण; एकावर गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून लाकडाने मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० जुलै रोजी दुपारी मित्र नगर शेळगी येथे घडली.याप्रकरणी फारूक करीन शेख (वय-४४,रा.मित्र नगर,शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून जुबेर निसार मुल्ला (रा. मित्र नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी कामावर हसताना वरील संशयित आरोपी याने फिर्यादीला फोन करून बोल-ावून घेऊन तू माझ्याबद्दल लोकांना काय खोटे सांगून नावाची बदनामी करत आहे. असे म्हणत शिवीगाळ करून लाकडाने डोक्यात व पायावर मारून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भोगशेट्टी हे करीत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१२.ईएल.१७२७ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १२ ते १३ जुलै दरम्यान घडली.याप्रकरणी रेश्मा अरुण पवार (वय-२५,रा.भीमा अपार्टमेंट, सुंदरम नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पो-लीस हेडकॉन्स्टेबल शिर्के हे करीत आहेत.

### व्यापारासाठी माहेरून पैसे घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ करत मारहाण; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता हि सासरी नांदत असताना सासराकडच्या मंडळींनी मिळून तुझ्या आई-वडिलांनी लग्नात मानपान केला नाही व्यापारासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये असे म्हणत शिवीगाळ करत मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत माहेरी हाकलून दिल्याची फिर्याद मैवश म.उमेज मुजावर (वय-२४,रा. साखरपेठ) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती म.उमेज, सासरे एजाजअहमद, सासू यास्मीन व नणंद अन्सारी (सर्व.रा.दक्षिण सदर बझार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना ७ जानेवारी २०२५ ते ८ जुलै २०२५ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

# पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील महावितरण व महापारेषणची कामे मार्गी लागणार : आ.समाधान आवताडे

## ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या सूचना;आढावा बैठकीत १९ मागण्यांना हिरवा कंदील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारताची दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पंढरपूर मध्ये भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणे यासाठी प्रथम प्राधान्य देत मतदार संघाचे आमदार समाधान दादा आवताडे यांनी राज्याच्या ऊर्जा विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या समवेत मुंबईत आढावा बैठक घेत ऊर्जा विभागाशी संबंधित विविध मुद्द्यावर चर्चा केली. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांतील विविध विद्युत कामे लवकरच मार्गी लागणार आहेत. सदरच्या आढावा बैठकीत विविध मागण्या बाबत ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सदरच्या मागण्यांच्या कार्यवाही बाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्याने मतदारसंघातील महावितरण व महाप-ारेषण विभागाकडील मंजूर तसेच प्रलंबित कामाबाबत हिरवा कंदील दाखवला आहे.




पंढरपूर शहराचा वाढता आलेख लक्षात घेता काही नवीन कामे उभा करणे गरजेचे आहे तसेच शहरात वर्षाकाठी भरणार्या चार यात्रांमध्ये भाविकांना म हत्त्वाच्या ठिकाणी विद्युत प्रकाशा बाबत निर्णय घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाम ध्ये ज्या शेतकऱ्यांना सोलर पाहिजे आहे त्यांना सोलर वर कनेक्शन व ज्यांना विजे-चे कनेक्शन पाहिजे आहे त्यांना विजेचे कनेक्शन दिले जावे., मतदार संघामध्ये ओव्हरलोड असलेल्या सब स्टेशनमध्ये अतिरिक्त ट्रांसफार्मर बसवण्यात यावेत., मतदारसंघांमध्ये मुख्यमंत्री सोलर योजनेची कामे चालू आहेत व आर डी एस एस या कामांना गती देण्यात यावी., मतदारसंघाम ध्ये शासनाच्या निरंतर योजनेतून जे ओव्हरलोड ६३ चे ट्रांसफार्मर आहेत त्या ठिकाणी शंभर चे ट्रांसफार्मर बसवण्यात यावे यासाठी लागणाऱ्या निधीची ही म ागणी यावेळी करण्यात आली.

पंढरपूर शहरासाठी चंद्रभागा नदीप-ात्रामध्ये असलेली ११ केवी उच्च दाबाची लाईन घाटाच्या बाजूने अंडरग्राउंड टाकण्यात यावी., गोपाळपूर येथील दर्शन रांग शेजारील पत्रा शेड येथे ३३ केवी सब स्टेशन असावे., तसेच वाखरी पालखी तळावर सुद्धा ३३ केवी सबस्टेशन असावे., पंढरपूर सांगोला रोडवरील महावितरण येथे मोठे वर्कशॉप आहे त्या बाजूला ३३/११ सब स्टेशन उभारणे गरजेचे आहे.,६५ एकर मध्ये ३३/११ सबस्टेशन उभारणे., पंढरपूर परिसरामध्ये ४०० केवीचे सब स्टेशन उभारण्यात यावे., महापारेषण चे सोलापूर येथे सर्कल ऑफिस असून त्याचे विभाजन करून पंढरपूर येथे सर्कल ऑफिस उभारण्यात यावे.

मंगळवेढा शहर व तालुक्यासाठी यड्राव आणि कचरेवाडी येथे ३३/११ सबस्टेशन उभारणे., मंगळवेढा शहरात वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर दुसऱ्या ठिकाणाहून वीजपुरवठा करण्याची सोय नाही त्यामुळे त्यासाठी दुसरी नवीन वाहिनी टाकण्यात यावी., मंगळवेढा तालुक्यात विभागीय कार्यालय उभारण्यात यावे., नंदुर सब स्टेशनचे काम संथ गतीने केले असल्याम ुळे संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्याच्या सूचना राज्यमंत्री यांनी दिल्या., मंजूर असलेले लक्ष्मी दहिवडी मंगळवेढा शहर, मरोळी, गोपाळपूर, विठ्ठल मंदिर येथे सब स्टेशनचे काम तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली., निंबोणी येथे १३२ केवीचे सब स्टेशन उभा केले आहे. त्यावर लोड नसून दक्षिण भागा-तील सब स्टेशनचा लोड त्यावर टाकण्यात यावा.,मंगळवेढा शहर व एमआयडीसी भागांमध्ये वीस जाण्याचे व वीज दाब कमी जास्त होण्याचे प्रमाण वाढत असल्याने नागरिक व व्यापाऱ्यांना याचा त्रास होत आहे तरी त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी आदी मागण्या राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या कडे मतदार संघाचे आमदार समाधान दादा आवताडे केल्यानंतर सर्व मागण्या मान्य करत सर्व विषयावर कार्यवाही करण्याच्या सूचनाही संबंधित विभागातील अधिकारी यांना दिल्या आहेत.

# पंढरपुरातील विठ्ठल मंदिराचे पावित्र्य धोक्यात! मंदिरात पान, तंबाखू, गुटखा खाऊन थुंकतात : गणेश अंकुशराव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरातील श्रीविठ्ठल रुक्मिणी मातेच्या मंदिरात चक्क पान, तंबाखू, गुटखा खाऊन थुंकत असल्याची धक्कादायक घटना येथील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक गणेश अंकुशराव यांनी उघडकीस आणली असून यामुळे मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले असुन देवाच्या मंदिरातच असे घाण-ेरडे कृत्य करणारांचा शोध घेऊन कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे.

नुकतेच गणेश अंकुशराव हे श्री विठ्ठल मंदिरात गेलेले असताना भाविक देवा-चे मुखदर्शन घेऊन बाहेर पडतात त्या दरवाज्यासमोरच श्री रूक्मिणी मातेच्या समोरील बाजुस कोपऱ्यात धुम्रपान करून थुंकल्याचे निदर्शनास आले. याठिकाणचे व्हिडिओ आणि छायाचित्रे ही गणेश अंकुशराव यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहेत.



लाखो वारकरी भाविकांचं श्रध्द-ास्थान असलेल्या आमच्या आराध्य दैवताच्या मंदिराची इथे अशा प्रकारे विटंबना होत असताना, मंदिराच्या पावित्र्याला गालबोट लागत असताना मंदिर समिती सदस्य, मंदिर समि तीचे अधिकारी काय करत आहेत? काय झाले दहा लाखांच्या स्वच्छतेच्या ठेक्याचे ? असा खडा सवाल गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे.

सदर ठिकाणी शंभर टक्के येथील मंदिर समितीचे कर्मचारीच अशा प्रकारे धुम्रपान करून थुंकत असणार!! असा दाट संशय असल्याचंही गणेश अंकुशराव म्हणा-लेत.

जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी याकडे लक्ष घालून सदर प्रकाराची तातडीने चौकशी होऊन असे किळसवाणे गैरकृत्य करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी म ागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे.

दरम्यान मंदिरातील हा प्रकार समोर आल्यानंतर वारकरी भावीकांमधूनही संताप व्यक्त होत आहे.

# पंढरपूर टपाल विभागात २ ऑगस्ट रोजी सार्वजनिक व्यवहार बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : टपाल विभागाला पुढील पिढीतील एपीटी ॲप्लिकेशन (आयटी २.०) अंमलबजावणी करण्याची सुरुव-ात करण्यात येत असल्यामुळे पंढरपूर विभागातील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि. २ ऑगस्ट रोजी सर्व सार्वजनिक व्यवहार बंद रा-हणार असल्याचे पंढरपूर विभागाचे अधीक्षक डाकघर चंद्रकांत भोर यांनी कळविले आहे.

**आयटी २.० ॲप्लिकेशनची ४ ऑगस्टपासून सुरुवात**

डिजिटल उत्कृष्टता आणि राष्ट्र उभारणीच्या प्रवासात एक मोठी झेप आहे. या परिवर्तनकारी उपक्रमाचा एक भाग म्हणून, अपग्रेड केलेली प्रणा-ली पंढरपूर विभागामधील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि. ४ ऑगस्ट, २०२५ रोजी लागू करण्यात येणार आहे.

या प्रगत डिजिटल प्लॅटफॉर्मवर एक अखंड आणि सुरक्षित संक्रमण सक्षम करण्यासाठी दि. २ ऑगस्ट, २०२५ रोजी नियोजित डाउनटाइम करण्यात आला आहे. त्यामुळे २ ऑगस्ट, २०२५ या रोजी पंढरपूर विभागातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये कोणतेही आर्थिक पत्रव्यवहार केले जाणार नाहीत. डेटा मायग्रेशन, सिस्टीम व्हॅलिडेशन आणि कॉन्फिगरेशन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, नवीन सिस्टम सुरळीत आणि कार्यक्षमतेने लाइव्ह होईल याची खात्री करण्यासाठी सेवांचे हे तात्प-ुरते निलंबन आवश्यक आहे. एपीटी ॲप्लिकेशन वापरकर्त्यांचा अनुभव वाढविण्यासाठी, जलद सेवा वितरण आणि अधिक ग्राहक-अनुकूल इंटरफेस प्रदान करण्यासाठी डिझाईन केले आहे. ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आ-वाहन अधीक्षक डाकघर चंद्रकांत भोर यांनी केले आहे.

# पत्रकार ऋषी भोपळे यांच्या खांद्यावर व्हॉईस ऑफ मीडियाची मोठी जबाबदारी! डिजिटल विंगच्या तालुका अध्यक्षपदी झाली निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

पत्रकार आणि पत्रकारितेसाठी लढणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या संघटनेच्या चिखली तालुका डिजिटल विंगच्या तालुकाध्यक्षपदी पत्रकार ऋषी भोपळे यांची निवड झाली आहे. देऊळगाव घुबे सारख्या ग्रामीण भागातून येत ऋषी भोपळे यांनी पत्रकारितेत अल्पावधीत नावलौकिक कमावला आहे..



डिजिटल प्लॅटफॉर्म साठी काम करताना ऋषी भोपळे यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले आहे.

बुलडाणा लाइव्ह, या यशिवाय ग्रामीण भागातील सामान्यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी ऋषी भोपळे यांची लेखणी चालते. अतिशय स्पष्ट आणि निर्भीड पत्रकार म्हणून त्यांनी ओळख मिळवली असून ते उत्कृष्ट संघटक देखील आहेत. पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी काम करणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया या संघटनेच्या चिखली तालुकाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के आणि जिल्हाध्यक्ष कृष्णा सपकाळ यांच्या मार्गदर्शनात डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष नितीन कानडजे पाटील यांनी श्री. भोपळे यांची नियुक्ती केली आहे. डिजिटल ऑमाध्यमातील पत्रकारांचे संघटन तयार करण्याचे काम डिजिटल विंग करत आहे. या माध्यमातून डिजिटल क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नांना शासन दरबारी पोहोचवण्याचे कामही व्हाइस ऑफ मीडिया करीत आहे. ऋषी भोपळे यांच्या नियुक्तीचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कालकथित रेशमा भगवान गोतसुर्वे स्मृतीदिनी वृक्षारोपणसह विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आचेगांव : माजी तंटामुक्त अध्यक्ष सोसायटी संचालक भगवान गोतसुर्वे यांच्या सुविध्य पत्नी स्मृतीशेष रेशमा भगवान गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनानिमित्त आचेगांव ता. दक्षिण सोलापूर या ठिकाणी विविध ठिकाणी ट्री गार्ड (जाळी )लावून वृक्षारोपण करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



सर्व प्रथम श्री शावरसिद्ध प्रशाला येथे त्यांची मुले सौमित व कुंजल यांच्या वतीने श्री शावरसिद्ध प्रशा-लेचे मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार व अशोक पाटील यांच्या 'एक पेड मेरे माँ के नाम' म्हणून झाडे लावण्यात आली, त्याच बरोबर साने गुरुजी मागासवर्गीय वसतिगृह, बौद्ध स्मशानभूमी व तका समाजमंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बलवान गोतसुर्वे यांनी मोठयाप्रमाणात नुसते झाडे लावणे इतकेच संकल्प नसून कमी प्रमाणात वृक्ष लावून त्यास संवरक्षक म्हणून लोखंडी जाळी (ट्री गार्ड )झाडे जास्त प्रमाणात झाडे जगवणे हा उद्देश असल्याचे सांगितले. यावेळी स्मृतीशेष -रेश्मा भगवान गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आचेगांव श्री शावरसिद्ध प्रशाला, सानेगुरुजी वसतिगृह, बौद्ध स्मशानभूमी व तका परिसर येथे वृक्षारोपण करण्यात आले.

सर्व प्रथम प्रतिमा पूजन व सायंकाळी पुण्यस्मरण विधी करण वाघमारे यांनी पार पाडली. वृक्षारोपण व पुण्यस्मरण विधी प्रसंगी मुख्याध्यापक इब्राईम बिराजदार, अशोक पाटील, विकास सुर्वे भगवान गोतसुर्वे,बनसिद्ध गुरव, बलवान गोतसुर्वे, अनिल पाटील, संजय गोतसुर्वे,मारुती गोतसुर्वे,दर्शन गोतसुर्वे, मनोज गोतसुर्वे,जितेंद्र गोतसुर्वे,भारत सोनकांबळे,पांडुरंग सुर्वे,विशाल सुर्वे, जयंती अध्यक्ष राम गोतसुर्वे,अरुण थोरात, इस्माईल शेख, करण गजधाने,संघर्ष शिंदे, सनी देवरे, धनंजय गायकवाड,विजय वाघमारे,सुधाकर गोतसुर्वे, शिवाजी गोतसुर्वे, अभिषक गोतसुर्वे,सौमित गोतसुर्वे खाजेंद्र भणजे,निरंजन गोतसुर्वे आदिसह सर्व नातेवाईक,श्री शावरसिद्ध प्रशाला शिक्षक व कर्मचारी,डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव पदाधिकारी व गावकरी उपस्थित होते.रात्री अमरभीम गायन पार्टी वतीने श्रद्धांजलीपर गीत गायन करण्यात आले.

**१ ऑगस्ट रोजी रंगभवन सभागृह येथे महसूल सप्ताह शुभारंभाचा कार्यक्रम होणार**

**१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन**

# जिल्ह्यात १ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महसूल विभागामार्फत राज्यात दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन व दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह २०२५ साजरा करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्यानुसार सोलापूर महसूल प्रशासनाने १ ऑगस्ट रोजी रंगभवन येथे महसूल दिन व महसूल सप्ताह शुभारंभ हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तसेच १ ते ७ ऑगस्ट कालावधीत जिल्हा व तालुका स्तरा-वर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूली कामे वेळच्या वेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसुलीच्या नोटीसेस पाठविणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांची चौकशी करणे इ. कामे वेळच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणा-या अधिकारी, कर्मचा-यांचा आणि महसूल वसुलीचे उदिष्ट पार करणा-या अधिकारी, कर्मचा-यांचा सत्कार करण्याकरीता आणि महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जन-तेसमोर ठेवण्याकरीता दरवर्षीप्रमाणे दिनांक १ ऑगस्ट, २०२५ हा महसूल दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा. तसेच, यावर्षी महसूल दिनाप-ासून दिनांक १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राज्यभरात महसूल सप्ताह-२०२५ साजरा करण्यात यावा, असे महसूल विभागाने २९ जुलै रोजी काढलेल्या शासन निर्णयात सुचित केलेले आहे.

या महसूल सप्ताहामध्ये, प्रत्येक दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत समाजाच्या विविध घटकांतील नागरिकांसाठी पुढीलप्रमाणे विशेष म ोहिम,कार्यक्रम,उपक्रम,शिबीरे,महसूल अदालती यांचे आयोजन करण्यात यावे.

**सोलापूर महसूल प्रशासनामार्फत महसूल सप्ताह मध्ये घ्यावयाच्या कार्यक्रमाचा तपशील...**

दिनांक, कार्यक्रमाचे स्वरुप:-

१ ऑगस्ट महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ

महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ

२ ऑगस्ट शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम

३ ऑगस्ट पाणंद, शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे

४ ऑगस्ट छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे

५ ऑगस्ट विशेष सहाय्य योजने-तील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे

६ ऑगस्ट शासकीय जमिनीं-वरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे, सरकारजमा करणे) निर्णय घेणे

७ ऑगस्ट च-डरपव धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (डजझ प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ

उपरोक्त प्रमाणे १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह निमित्त सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे सर्व कार्यक्रम जिल्हा, तालुका स्तरावर महसूल विभागाच्या वतीने आयोजित केले जाणार आहेत. तरी या सर्व कार्यक्रमांना संबंधित महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.